नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०८/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## विनयभंग

पो.स्टे. खापा :— दिनांक ०६/०९/२०२२ चे २१.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्ष हिचा आरोपी नामे— अंकीत धनराज पक्कीडे, वय २३ वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर जि. नागपूर तिचा पाठलाग करून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (ड), ५०६ भादंवी. सहकलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि प्रियंका गेडाम मो.नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत ३० कि. मी. अंतरावरील मौजा सिताखैरी येथे दि. ०५/०९/२०२२ चे १५.०० वा. ते १५.३० वा. सुमारास **सौ अर्चना सुभाष जातगडे (मृतक), वय ४२ वर्ष, रा. सिताखैरी ता हिंगणा जि नागपुर** हिने अज्ञात कारणातुन आपले राहते घरी विषारी औषध प्राषण केले. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचार कामी पीएससी अडेगाव व त्यानंतर शस्त्रत हॉस्पीटल नागपुर येथे भरती करून तिथुन परत रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती करण्यात आले होते. उपचार दरम्यान डॉक्टरांनी तिला तपासुन दिनांक ०७/०९/२०२२ चे ११.५० वा. मृत घोषीत केले. सदरची मर्ग सुचना मेडीकल कॉलेज नागपुर येथुन पो. स्टे. कोंढाळी ला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक नितीन लवटावार पो.स्टे. कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार बाबुलाल राठोड मो.क्र. ७७९८३४४९१९ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा तरोडा येथे दिनांक ०७/०९/२०२२ चे ०६:०० वा. पुर्वी **अशोक दत्तूती बेम्पे(मृतक), वय ४२ वर्ष, रा. तरोडा ता काटोल जि. नागपूर** हा दारू पिण्याचे सवईचा असून दि ६.९.२२ रोजी सायंकाळी ०५.०० वा. दरम्यान तो दारू पिवून घरी आला व पत्नी सोबत घरगुती कारणावरून झगडाभंडण केले. त्यानंतर तो काही वेळाने घरून निघून त्याचा साळा नामे— राहिलामाला जागी मिस्त्री रा. तरोडा यांचेकडे थांबून जेवन केले व दि ०७/०९/२०२२ रोजी सकाळी उठून खर्रा घेवून येतो असे म्हणून निघून गेला. त्यानंतर गावातील लोकांनी मृतकास रोडवरील शेतातील आंब्याच्या झाडाला दुपटयाने गळयाला बांधुन तसेच झाडाला बांधून गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गिता अशोक बेम्पे, वय ४० वर्ष, रा. तरोडा ता काटोल जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मंगेश धारपुरे मो.क्र. ७७९८३४४९१९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर